## राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,महाराष्ट्र,पुणे.

## राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धा सन 2023-2024

## माध्यमिक शिक्षक गट

# नवोपक्रम

# “एकात्मिक शिक्षणाचा झरा,परसबाग खरा.”


उपक्रमकर्ता: श्री.अजित हरी पाटील.

(सहा.शिक्षक)

शाळा: दे.भ.रत्नाप्पाण्णा कुंभार हायस्कूल,

राजापूर . ता. शिरोळ, जि. कोल्हापूर.

**संपर्क क्रमांक : 9420250878**

**मार्गदर्शक:डॉ.श्रीमती.अंजली रसाळ.**

**(वरिष्ठ अधिव्याख्याता,जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, कोल्हापूर )**

# ☯ नवोपक्रमकर्ता परिचय ☯

- ❖ **नवोपक्रम शीर्षक** : **"एकात्मिक शिक्षणाचा झरा,परसबाग खरा."**
- ❖ **नवोपक्रम कर्त्याचे नाव** : **श्री.अजित हरी पाटील.**
- ❖ **पद** : सहा.शिक्षक
- ❖ **संस्थेचे नाव** : ज्ञान सरिता शिक्षण संस्था.
- ❖ **शाळेचे नाव** : दे.भ.रत्नाप्पाण्णा कुंभार हाय,राजापूर.
  ता.शिरोळ, जि.कोल्हापूर.
- ❖ **नवोपक्रम गट** : माध्यमिक शिक्षक गट.
- ❖ **कायमचा पत्ता** : मु.पो.कुरुंदवाड
  ता.शिरोळ.जि.कोल्हापूर 416106
- ❖ **शैक्षणिक अर्हता** : B.A.B.Ed,DSM.
- ❖ **नोकरी रुजू दिनांक** : 15/06/2000
- ❖ **एकूण सेवा** : 24 वर्षे
- ❖ **संपर्क क्रमांक** : 9420250878
- ❖ **ई-मेल आय डी** : jtpatil3@gmail.com
- ❖ **नवोपक्रम करत असलेला कालावधी** : सहा महिने
- ❖ **नवोपक्रम अहवाल एकूण पृष्ठ संख्या** : 35

# ❖प्रस्तावना ❖

'प्रधान मंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत' शाळेमध्ये परसबाग उपक्रम राबविण्यात बाबतचे परिपत्रक **शालेय शिक्षण व क्रीडा विभाग** याचे (दिनांक 11जुलै 2023) वाचन माननीय मुख्याधापक श्री. एस.बी .मठपती (सर) यांनी मासिक मिर्टिंग मध्ये वाचन केले व परसबाग निर्मितीची जबाबदारी माझ्यावरती सोपवली. वारंवार येणाऱ्या पुरा मुळे व काळी माती असल्या मुळे मुलांना खेळण्यासाठी मैदान ऑगस्ट पर्यंत उपलब्ध होत नसे. शैक्षणिक वर्ष सन 2022/2023 मध्ये क्रीडा अनुदानातून शालेय परिसराचे व मैदानाचे मुरमिकरण करून घेतले असल्या मुळे परस निर्मिती करत लागणारा जमिनीचा सर्व भूभाग मुरमिकराना खाली गेला होता .त्यामुळे शाळेच्या मालकीची जमीन परसबागे शिल्लक नव्हती. परसबाग निर्मिती साठी गरज होती ती जमिनीची.शाळेच्या मैदानला लागून मा.श्री.जयप्रकाश चौगुले (मु.पो.अकिवाट) यांची चालूपड जमीन होती.त्यांना मी व आमच्या शाळेचे कर्मचारी मा.श्री.अजित बेरड यांनी जमीन मालकांच्या घरी जाऊन परसबाग निर्मितीचा हेतू सांगितला व जमीन वापरासाठी देण्याची विनंती केली.**एका क्षणाचाही विलंब न लावता व कोणती ही अट न घालता त्यांनी होकार दिला** . आणि एकात्मिक शिक्षणा झरा सुरु झाला.

**'जीवन शिक्षण'** माहे ऑक्टोबर 2023 अंकातील **"परसबागेचे महत्व व शैक्षणिक उपयोजन"** हा लेख **मा.श्री.विजयकुमार पाईकराव** (YCMOU नाशिक) यांचा लेख वाचला आणि मना मध्ये खुणगाठ बांधली कि मुलांना शालेय परसबागेतून विज्ञान,कृषी ,इतिहास ,भूगोल ,भाषा ,तंत्रज्ञान व कार्यानुभव विषयांचे ज्ञान देऊ शकतो.आणि खऱ्या अर्थाने या लेखामुळे परसबाग निर्मितीची दिशा मिळाली.

कोल्हापूर जिह्यातील शिरोळ तालुक्याला **वाढला जीवघेण्या कर्क रोगाचा(कॅन्सर)** धोका असा प्रकारच्या बातम्या अनेक वृत्तपत्रातून येऊ लागल्या होत्या.मतमतांतर होऊ लागली. चर्चा घडू लागल्या. या सर्व गोष्टीचा विचार करून आपण शालेय जीवनामध्ये विद्यार्थी मनामध्ये सेंद्रिय शेतीचा संस्कार रुजविण्याचा ठाम निश्चय केला. मग सुरु झाला सेंद्रिय परसबागेचा प्रवास . परसबाग फुलली ,पाने-फुले ,फळांची लिपी मला कळली .शाळेतील विध्यार्थी अभ्यासासोबत आता सेंद्रिय शेतीचे धडे गिरवत आहेत.

# ❖अनुक्रमणिका


| अ.क्र. | अहवाल लेखन घटक | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| 1 | नवोपक्रम शीर्षक | 6 |
| 2 | नवोपक्रम गरज व महत्व | 7 |
| 3 | नवोपक्रमची उद्दिष्टे | 9 |
| 4 | नवोपक्रमाचे नियोजन | 10 ते 27 |
| 5 | नवोपक्रमची कार्यपद्धती | 28 ते 29 |
| 6 | नवोपक्रमाची यशस्विता/फलनिष्पती (उद्दिष्टानुसार ) | 30 ते 34 |
| 7 | समारोप | 35 |
| 8 | संदर्भसूची व परिशिष्टे | 36 |

## ❖प्रतिज्ञापत्र❖

मी.**श्री.अजित हरी पाटील.** प्रतिज्ञापत्रप्रती लिहून देतो की,या नवोपक्रम स्पर्धेसाठी सादर केलेला **"एकात्मिक शिक्षणाचा झरा,परसबाग खरा."** हा नवोपक्रम माझ्या स्वतःच्या शैक्षणिक उपक्रमावर अनुभवावर आधारित आहे.हा नवोपक्रम मला स्वतःला सुचलेला आहे, काल्पनिक नाही.तसेच भारतीय अथवा विदेशी लेखकांच्या ग्रंथातील अथवा संशोधनातील माहितीच्या आधारे हा नवोपक्रम लिहिलेला नसून यामध्ये मी राबिवल्या कृती लिहिलेल्या आहेत.हा नवोपक्रम मी इतर कोणत्याही नवोपक्रम स्पर्धेसाठी अथवा MSCERTमार्फत आयोजित या पूर्वीच्या राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धेसाठी सादर केलेला नाही.तसेच इतर कोणत्याही व्यक्तीकडून लिहून घेऊन तो मी माझ्या नावावर सादर केलेला नाही. तसे आढळून आल्यास तो Copyright Act1९५७ खाली दाखलपात्र गुन्हा आहे याची मला कल्पना आहे.

दिनांक : 10/12/2023



स्थळ : राजापूर


स्पर्धकाची स्वाक्षरी

## ❖प्रमाणपत्र ❖

प्रमाणित करण्यात येते की, श्री.अजित हरी पाटील हे माझ्या शाळेत कार्यरत असून त्यांनी सादर केलेला **"एकात्मिक शिक्षणाचा झरा,परसबाग खरा." हा** नवोपक्रम त्यांनी स्वतः राबिवला असून ती त्यांच्या स्व परिश्रमाची फलश्रुती आहे . हा नवोपक्रम त्यांनी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,महाराष्ट्र ,पुणे मार्फत आयोजीत यापूर्वीच्या राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धेसाठी सादर केलेला नाही.

दिनांक : 10 /12 /2023

मुख्याधापक स्वाक्षरी/ नाव :




**श्री.एस.बी.मठपती**

स्थळ : राजापूर

## 1.नवोपक्रमाचे शीर्षक

# “एकात्मिक शिक्षणाचा झरा ,परसबाग खरा.”



शालेय विषयातील पर्यावरण,विज्ञान,कृषी ,इतिहास ,भूगोल ,भाषा ,तंत्रज्ञान,परिसर अभ्यास,भाषा व कार्यानुभया सर्व विषयांचे एकात्मिक ज्ञान देऊन सेंद्रिय शेतीचा संस्कार विध्यार्थी मनावरती शालेय जीवनात रुजविणे या साठी हा नाविन्यपूर्ण उपक्रम

# ❖उपक्रमाची गरज व महत्व❖

## ❑ i) उपक्रम निवडण्याचे कारण :

कोल्हापूर जिल्हयातील शिरोळ हा **उगवत्या सूर्याचा तालुका** म्हणून ओळखला जातो.मात्र 2018 नंतर वर्तमान पत्रातून,TV चॅनल वेगवेगळ्या बातम्या येऊ लागल्या **कोल्हापूर जिल्हातील शिरोळ तालुक्याला वाढला जीवघेण्या कर्क रोगाचा धोका,कोल्हापूर बनतेय कॅन्सर' पूर** या ना अशा अनेक पद्धतीच्या बातम्या येऊ लागल्या त्या वेळी मन अस्वस्थ होत असे. भूगोल विषय अध्यापन करत असताना 'जैविक विषवृधी' मानवी जीवनावर होणारे परिणाम समजले होते . भाजीपाला किडू नये म्हणून विविध प्रकारची **अंतरप्रवाही** किटकनाशकांचा मोठ्या प्रमाणात वापर केला जात आहेत.त्यामुळे जैविक विषवृधी वाढते.हे तोंडी ना सांगता सेंद्रिय शेतीचा संस्कार शालेय जीवनामध्ये विध्यार्थी मना मध्ये रुजविणे या साठी सेंद्रिय परसबाग निर्मिती केली.

हा उपक्रम निवडण्याचे म्हत्वाचे कारण म्हणजे, एखादी कृती किवा गोष्ट स्वत: केल्या नंतर जास्त काळ लक्षात राहते.विधार्थीना मशागती पासून पेरणी, खुरपण, काढणी ,वितरण ,विपणन ,प्रत्येक्ष मोजमाप या आणि सर्व गोष्ठी मुलांनी प्र्त्यक्ष केल्या त्यामुळे त्यांना जीवन कौशल्य मिळतील.

बातमी साठी लिंक https://youtu.be/__3qpM8Ru2w?si=PD5symO56Nuv8EE-

## ❑ ii) उपक्रमाचे वेगळेपण :

1) प्रत्यक्ष कृतीवर भर आहे.कृतीतून शिक्षण दिले आहे .
2) सेंद्रिय परसबागेतून वेगवेगळ्या पद्धती वापरून एकात्मिक शिक्षण धडे दिले .
3) ठिबक सिंचन व तुषार शिंचन पद्धतीचा वापर उत्कृष्ट पद्धतीने केला आहे..
4) रासायनिक कीटक नाशके न वापरता किड नियंत्रणासाठी हिंग पावडर चा वापर करण्यात आला आहे .
5) प्रत्यक्ष भेंडी व इतर भाजीपाला स्वत: उत्पादन करून विक्री करण्यात आली आहे.

6) परसबागेतील उत्पादन विक्रीसाठी आकर्षक मांडणी व पॅकिंग स्वतः मुलांनी तयार केली आहेत.

7) आकर्षक पॅकिंग संगणकाद्वारे तंत्रज्ञानाचा वापर करून तयार केली आहेत .

8) सेंद्रिय शेतीच्या प्रसारासाठी गावातील सर्व कार्यालये उदा.बँका,प्राथमिक शाळा,उर्दू शाळा,ग्रामपंचायत कार्यालय यांना सेंद्रिय शेतीचे महत्व व माहिती पत्रक वाटप केले आहे .

9) पोषण आहार मध्ये ताज्या भाजांचा समावेश केला आहे .

10) (Tissue Culture) फळभाज्यांना कोणत्या पद्धतीने कलम करावे हि दूरस्थ पद्धतीने कर्नाटक राज्यातील कुरणे रोपवाटिका हंचीणाल ता.निपाणी यांचाशी संपर्क साधून माहिती दिली आहे .

11) टाकाऊ प्लास्टीक च्या ग्लास व बोतल चा वापर करून हायड्रोपोनिक शेतिचे धडे मुले गिरवत आहेत .

12) झेंडूची फुलेझाडे लावण्या पासून त्यांची काढणी व त्यापासून व्यावसायिक हार निर्मिती सर्व विध्यार्थी करतात.

13) परस बागेतून विध्यार्थायनी Seed बँक तयार केली आहे.

14) परसबागे मध्ये परागीभवन होण्यासाठी फुलझाडे लावली आहेत.

15) रासायनिक खतांचा वापर न करता जीवामृत व हिरवळीचे खताचा वापर केला.आहे.

16) जीवामृत कसं तयार केले जाते,जीवामृत मध्ये अनेक जीवाणू मिसळले जातात जे पिकांना बुरशी, कीड पासून दूर ठेवते याची माहिती मुलांना माहिती मिळाली आहे.मुले कमी प्रमाणात जीवामृत तयार करतात.

17) Google Lensचा वापर करून विध्यार्थी विविध प्रकारच्या भाज्या नावे औषधी उपयोग , उत्पादन कसे घेतले जाते,कोणत्या हवामानात पिक घेतले जाते इत्यादि माहिती घेऊन परसबागनिर्मितीसाठीतंत्रज्ञानाची जोड दिली आहे.

18) Google Lens चा वापर करून फळ व पालेभाज्या चा इतिहास समजून घेतला.

19) परसबागेचे क्षेत्रफ़ळ गुठ्ठे वारीत कसे काढले जाते या व अनेक कृती प्रत्यक्ष केल्या मुळे अध्यन – अध्यापन प्रक्रिया आनंददायी वातावरणात पूर्ण होण्यासाठी उपयुक्त ठरला आहे.

## ❑ iii) उपक्रमाची उपयुक्तता :

या उपक्रमामुळे मुलांची निसर्गाशी जवळीक वाढली.स्वतः उत्पादित केलेला ताजा भाजीपाला पोषण आहारामध्ये शिजवला जाऊ लागला त्यामुळे मुले आनंदाने सर्व प्रकारच्या भाज्या खाण्याची आवड निर्माण झाली.मुलांच्या मध्ये निरिक्षण शक्ती वाढली.मुले झाडाची वाढ,फळ धारणा ,फुले,फळ व पालेभ्याज्याची जुण व कोवल्या असे वर्गीकरण करू लागली.मुलांना परसबागे मधून वेगवेगळ्या विषयाचे ज्ञान मिळू लागले .विध्यार्थाना शेतीविषयी पायाभूत माहिती मिळाली. Seed बँक मध्ये मुले बिया गोळा करू लागली.विध्यार्थी मना मध्ये बिया जमविण्याचा छंद निर्माण झाला .गोळा झालेल्या बिया परसबागे मध्ये वापरू लागली.परसबागेत तयार झालेय झेंडूच्या फुलापासून हार तयार करू लागली.सांगावयास आनंद वाटतो कि शाळेतील सर्व मुलांनी दिवाळी मध्ये फुले विकत घेऊन स्वत: लक्ष्मी पुजानासाठी हार तयार केले. Facebook, Click and join Telegram Click and join https://t.me/deshbhakteducationajitnitin व You Tube Click and join https://youtube.com/@ajitpatil5688?si=LgPwYqc93Ir8_v_c च्या माध्यमातून विविध विध्यार्थी कृतीना प्रसिद्धी दिली राज्यातील शिक्षक पालक, विध्यार्थी यांना या ई-साहित्याचा उपयोग झाला व करत आहेत. आणि भविष्यात देखील करतील म्हणून या उपक्रमाची उपयुक्तता आहे.

## 3.उपक्रमाची उद्दिष्टे :

- निसर्गाशी जवळीक वाढविणे.
- सेंद्रिय शेतीचा संस्कार मनामध्ये रुजविणे.
- शेतीविषयक प्राथमिक माहिती देणे.
- परसबागे मधून एकात्मिक शिक्षण देणे.
- बियाणे जमविण्याचा छंद निर्माण करणे.

## 4.उपक्रमाचे नियोजन :

परसबाग तयार करण्यापूर्वी त्याचे कालबद्ध नियोजन करण्यात आले .नियोजनामुळे परसबाग उभारणीचे काम सोपे झाले.कोणत्याही उपक्रमाची यशस्वीता ही नियोजनावर अवलंबून असते. उपक्रमाचे नियोजन माहे जून 2023 ते सप्टेंबर 2023 या कालवधीत खरीप हंगामाचे केले आहे. 1 नोव्हेंबर ते एप्रिल 2023 रब्बी हंगमाचे नियोजन केले आहे.परंतु नैसर्गिक आपत्ती,हवामान कालपरत्वे नियोजनात बदल होतो.

### ❑ i) उपक्रमपूर्व स्थितीचे निरीक्षण

2018 पासून वर्तमान पत्रातून येणाऱ्या कर्करोग संबधित बातम्या. त्या वरील मत मतांतर. शेती मध्ये वाढत चाललेला रासायनिक खतांचा व अंतरप्रवाही औषधांचा वापर. परिसरामध्ये सेंद्रिय शेती बद्दलची उदासीनता. बियाणे हा शेतीचा आत्मा असून देशी व इतर वाण यांचे संवर्धन करणे.प्रधानमंत्री पोषण निर्माण योजनेंतर्गत परसबाग निर्माण करता करता एकात्मिक शिक्षण कसे देता येईल याचा विचार करू लागलो.विध्यार्थीना कृतीतून शिक्षण देऊन नवनिर्मिती करणे आणि सेंद्रिय परसबाग निर्माण करणे आणि तीच परसबाग एकात्मिक शिक्षणाचा झरा बनविणे या विचाराने प्रेरित झालो होतो.उपक्रम राबविण्या पूर्वी मी माझ्या निरिक्षणातून पडताळा सूचीच्या आधारे उपक्रम पूर्व स्थितीचे निरिक्षण खालीलप्रमाणे केले आहे.

## पडताळा सूची

| अ.नं. | विधान | होय/ नाही |
|---|---|---|
| 1 | मुलांचे दैनंदिन अध्यापन सुरु होते . | होय |
| 2 | मुलांना शालेय परसबाग हीसंकल्पना माहिती होती. | नाही |
| 3 | सेंद्रिय शेतीबद्दल पुरेशे ज्ञान होते . | नाही |
| 4 | मुलांना खरीप व रब्बी हंगामाचा कालावधी माहिती होतो का. | नाही |
| 5 | कोणत्या भाज्यांच्या मधून कोणती जीवनसत्व मिळतात याची माहिती होती | नाही |
| 6 | सर्व प्रकारच्या बिया ओळखता येतात . | नाही |
| 7 | हाड्रोपोनिक शेती हा प्रकार माहिती होता | नाही |
| 8 | सर्व विध्यार्थीची निसर्गाशी जवळीक होती. | नाही |
| 9 | Seed बँक ही संकल्पना माहिती होती. | नाही |
| 10 | फळ भाजांची झाडे यांचे कलम करता येतात. | नाही. |
| 11 | जीवामृत फायदे तोटे माहिती आहेत. | नाही . |
| 12 | ठिबक व तुषार सिंचन पद्धत माहिती आहे . | होय |
| 13 | ठिबक व तुषार सिंचन जोडणी करता येते . | नाही |
| 14 | हार तयार करता येतात . | नाही |
| 15 | हार तयार करण्यासाठी लागणारे साहित्य माहिती होती | होय |

### ❑ ii) संबधित व्यक्तीशी,तज्ञांशी चर्चा :

या उपक्रमा बाबत सर्वप्रथम संस्थेचे **चेअरमन** : श्री.आय.एन.हिंगमिरे, **सेक्रेटरी** : श्री.के.एस.मठपती (निवृत्त इंग्रजी शिक्षक ), शाळेचे **मुख्याध्यापक**:श्री.एस.बी.मठपती, सहकारी शिक्षक, पालक,आजी माजी विद्यार्थी यांच्याशी नवोपक्रमाची गरज, स्वरूप,अंबलबजावणी या अनुषंगाने चर्चा केली.**परसबागेतून एकात्मिक शिक्षण देता येते का याची तज्ञांशी चर्चा करून त्यांची मते विचारत घेतली.**त्या मध्ये खालील मान्यवर शिक्षक,शेतकरी,पालक,रोपवाटिका मालक,फ्लॉवर मर्चंट आणि उद्यान पंडित यांचा समावेश .

1) मा.श्री.श्रीशैल मठपती (विज्ञान विषयाचे तज्ञ मार्गदर्शक )

2) मा.श्री.नितीन परीठ. (इंग्रजी विषयाचे तज्ञ मार्गदर्शक )

3) मा.श्री.शुभम कारदगे. (प्रगतशिल शेतकरी राजापूर )

4) सौ.सुरेखा यादव . (गणित विषयाचे तज्ञ मार्गदर्शक)

5) मा.श्री.एच.एस. विनोदकर (कार्यानुभव विषयाचे तज्ञ मार्गदर्शक)

6) मा.श्री.कुमार व रणजित तवंदकर (प्रगतशिल शेतकरी,अकिवाट)

7) मा.श्री.संतोष ढवळे (प्रगतशिल शेतकरी राजापूर )

8) मा.श्री.ओंकार कुरणे (उद्यान पंडित ,हंचीणाल कर्नाटक)

9) मा.श्री.विनायक घारगे. (प्रगतशिल शेतकरी राजापूर )

## 10) ❑ नवोपक्रमासाठी सहकार्य व मार्गदर्शन:

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,कोल्हापूरचे प्राचार्य मा.श्री.डॉ.आय.सी.शेख.मा.सौ डॉ.अंजली सतीश रसाळ.(जेष्ठ अधिव्याख्याता डाएट कोल्हापूर, ) व सौ.सरिता कुदळे(अधिव्याख्याता डाएट कोल्हापूर) व इतर सन्मानीय अधिव्याख्याते यांचे अनमोल मार्गदर्शन व प्रेरणा मिळाली.ई साहित्य वापरत असलेल्या परिसरातील सर्व शिक्षक,पालक यांचे प्रोत्साहन मिळाले.हा उपक्रम अधिक प्रभावी ठेवण्यासाठी शिक्षक,पालक यांच्याशी सुसंवाद ठेवला आहे.

या नवोपक्रमासाठी श्रीमती .भारती कोळी (गटशिक्षणाधिकारी पं.स शिरोळ) श्री. ए.एस ओमासे (बीट विस्तार अधिकारी) श्री.सुरेश कोळी.(केंद्र समन्वयक) केंद्र अकिवाट, श्रीमती एन.एच काझी (विषय तज्ञ गट साधन केंद्र शिरोळ) यांचे मार्दर्शन व प्रेरणा मिळाली.सदर नवोपक्रम अधिक प्रभावी कसा राबविता येईल या विषयी वेळोवेळी मार्गदर्शन केले.मा.श्री.नितीन परीट (सर) व मुकुंद माळी सर यांनी परसबागे मध्ये इंग्रजी विषयाच्या कोणत्या Activity घेता येतील या विषयीमार्गदर्शन केले .

## ❑ iii) आवश्यक साधनांची निर्मिती व विचार :

हा नाविन्यपूर्ण उपक्रम सुरु करण्यासाठी सर्वात महत्वाचे नैसर्गिक संसाधन उपलब्ध असणे गरजेचे होते ते म्हणजे जमिन.शाळे शेजारी असणारी जमिन मा.जयप्रकाश चौगुले यांनी उपलब्ध करून दिली.मशागती साठी लागणारे यांत्रिक अवजारे (ट्रक्टर) माजी विध्यर्थी याच्याशी संपर्क साधून उपलब्ध करून घेतले. या कृतीयुक्त उपक्रमासाठी विविध प्रकारची शेती शी निगडीत साहित्य लागणार होती.उदा.खोरे(फावडे ) ,खुरपे ,टिकाव ,कुदळ,कटर,झारी,इत्यादि ज्यावेळी गरज असेल त्या वेळी मुलांना घरातून घेऊन येण्यास सांगून त्याचा वापर केला. परसबाग व

व्हॉलीबॉल मैदानाचे अंतर जवळच असल्यामुळे मुलांनी व्हॉलीबॉल जाऊन परसबागेचे नुकसान होऊ नये म्हणून मुलांनी जुन्या साडीचा वापर करून प्रतिबंध केला.पंचगंगा सहकारी पाणीपुरवठा संस्थेने कडून सिंचनासाठी पाण्याची सोय उपलब्ध करून दिली.

मुलांना विविध फळभाज्या ब पालेभाज्या यांची सविस्तर व शात्रीय माहिती मिळावी या साठी Google Lence चा वापर करून तंत्रज्ञानाची जोड दिली.त्या साठी शाळेतील सर्व स्टाफने मोबाईल देऊन सहकार्य **Telegram Channe ,Face Book वरती सर्व माहिती व्हिडीओ उपलोड केले आहेत.** पालक,विद्यार्थी, शिक्षक यांना उपक्रमा विषयी माहिती देण्यासाठी YOU TUBE CHANNEL चा वापर करण्यात आला.**आजच्या घडीला 9.9 K Views आहेत.**

## ❑ नवोपक्रमांतर्गत घेतलेले उपक्रम कृती :

| नवोपक्रमांतर्गत घेतलेले उपक्रम कृती क्रमांक एक : | | |
|---|---|---|
| कृतीचे नाव | विद्यार्थी कृती | उपक्रमांची क्षणचित्रे |
| पूर्व मशागत वेचणी/पाचट व्यवस्थापन | 16/07/2023 रोजी नांगरट पूर्ण झाल्या नंतर विध्यार्थांच्या कडून परसबागेतील पाचटची वेचणी करून व्यवस्थापन केले. | **Click&Watch** https://youtube.com/shorts/J3PeNMUhXP4?si=3OWkJ9bXn2OekPR5 |
| ⁎विद्यार्थाचा प्रतिसाद/विद्यार्थावर परिणाम⁎<br>हि कृती करताना सर्व विध्यार्थी आनंदाने व उत्साहाने सहभागी झाले .या कृतीतून शारीरक शिक्षण अंतर्गत त्यांना वाकून चालेणे हि कृती पूर्ण झाली. पाचट न जाळता ते कुजविल्यास, तसेच त्याचा वापर आच्छादन म्हणून केला, तर कोणत्याही उत्पादनवाढीसाठी, मजुरी व पाणीबचतीसाठी उपयोग होऊ शकतो. जमिनीचा पोत सुधारून एकरी उत्पादनवाढीसाठी पाचटाचे आच्छादन फायदेशीर आहे हे मुलांना समजले. | | |

| नवोपक्रमांतर्गत घेतलेले उपक्रम कृती क्रमांक दोन : | | |
|---|---|---|
| कृतीचे नाव | विद्यार्थी कृती | उपक्रमांची क्षणचित्रे |
| चला तर मग शाळेच्या नावाची पेरणी करूया.... | 08/07/2023(शनिवार) वेळ 11.30 ते 12.30रोजी मुख्याध्यापक मा.श्री.एस .बी मठपती सर यांनी धूळ वाफे मध्ये अक्षर कशी रेखाटावीत याचे प्रात्यक्षिक रांगोळीच्या साह्याने दाखविले मुलांनी त्यानंतर हाताच्या साह्याने शाळेच्या नावाची पेरणी केली. | **Click&Watch** [https://drive.google.com/file/d/1JuDSDQnHuLf5M6foaX3iBW9jEaffQVTQ/view?usp=drivesdk](https://drive.google.com/file/d/1JuDSDQnHuLf5M6foaX3iBW9jEaffQVTQ/view?usp=drivesdk) |
| *विद्यार्थ्यांचा प्रतिसाद/विद्यार्थ्यांवर परिणाम* या कृती मध्ये मुलांनी उत्साहाने सहभाग घेतला. हि कृती करताना मुलांना कोणत्या पद्धतीने धूळ वाफ पेरणी करतात हे समजले .मेथीच्या बिया कोणत्या पद्धतीने पेरल्या जातात .या मेथीची उगवण लागवड केल्यावर सात ते आठ दिवसात होते हे समजले. मेथी कश्या पद्धतीने काढली जाते ती स्वच्छ कशी करावी.तसेच पेंढी विक्री साठी कशी तयारी करावी .या सर्व कृती मुलांनी आत्मसात केल्या . | | |

| नवोपक्रमांतर्गत घेतलेले उपक्रम कृती क्रमांक तीन : | | |
|---|---|---|
| कृतीचे नाव | विद्यार्थी कृती | उपक्रमांची क्षणचित्रे |
| फळभाज्या रोपांची लागवड करणे | मा.श्री,ए.एच.पाटील सरांनी सुरवातीला रोपाची लागवड कशी केली जाते हे कृतीतून दाखवून दिले .नंतर मुलांनी सर्व फळभाज्या रोपांची लागवड केली | **Click&Watch** [https://drive.google.com/file/d/1Jyn_J-bk6xcysi1XYbnBEd_ZxoCvw9-y/view?usp=gmail](https://drive.google.com/file/d/1Jyn_J-bk6xcysi1XYbnBEd_ZxoCvw9-y/view?usp=gmail) |
| *विद्यार्थ्यांचा प्रतिसाद/विद्यार्थ्यांवर परिणाम* या आणि असा अनेक कृतीतून मुलांना शेतीचे प्राथमिक ज्ञान मिळू लागले .रोपे कश्या पद्धतीने लावावयाची व त्याचे व्यवस्थापन कसे करावे या गोष्टी शिकू लागली .कमी पाण्याचा वापर करून चांगली शेती करता येते. हे मुलांना समजले | | |

| | | |
|---|---|---|
| नवोपक्रमांतर्गत घेतलेले उपक्रम कृती क्रमांक चार : | | |
| कृतीचे नाव | विद्यार्थी कृती | उपक्रमांची क्षणचित्रे |
| चला तर मग परागीकरण समजून घेऊया | मुले परसबागे मध्ये लावलेल्या फुल झाडांच्या वरती बसणाऱ्या मधमाशी ,फुलपाखरूंचे प्रत्यक्ष निरीक्षण करतात . | **Click&Watch**<br>https://drive.google.com/file/d/1KILREYkRVHzoGo2EeUcwSpj7hYhp4s_x/view?usp=drivesdk |
| *विद्यार्थ्याचा प्रतिसाद/विद्यार्थ्यावर परिणाम* | | |
| मुलांना परागीकरण फुलपाखरा मार्फत होते व परसबागे मध्ये असणाऱ्या फालभाज्यांचे उत्पादनात वाढ होते  हे समजले.कोणकोणत्या कीटकांच्या मार्फत परागीकरण होते ही मुले सांगू लागली. फुलपाखरे फुलांवरील मकरंद गोळा करण्याच्या उद्देशाने अनेक झाडांना भेटी देत असतात. त्या वेळी त्यांच्या पंखांना, शरीराला चिकटलेल्या परागकणांचा इतर फुलांतील बीजांडांशी मेळ होतो. यालाच परागीभवन म्हणतात हे त्यांनी प्रत्यक्ष पहिले . | | |

| | | |
|---|---|---|
| नवोपक्रमांतर्गत घेतलेले उपक्रम कृती क्रमांक पाच : | | |
| कृतीचे नाव | विद्यार्थी कृती | उपक्रमांची क्षणचित्रे |
| परसबागेतील भेंडी च्या भाजीचे वजन करणे. दशमान परिमाण (वस्तुमान) | मुले प्रत्यक्ष भेंडीचे वजन करतात किलो ,अर्धा ,पाऊण,पावशेर भेंडी वजन इलेक्ट्रॉनिक काट्या वरती करतात . | **Click&Watch**<br>https://youtu.be/aV1zGaULVQw?si=m6NDGkuXSs-1zZkM |
| *विद्यार्थ्याचा प्रतिसाद/विद्यार्थ्यावर परिणाम* | | |
| मुले खूप उत्साहाने इलेक्ट्रॉनिक वजन काट्या वरती वजन करू लागली.दशमान परिमाणे(वस्तुमान)संकल्पना पक्की झाली .मुलांना तोळ्या पासून क्विंटल ची संकल्पना समजली. | | |

| नवोपक्रमांतर्गत घेतलेले उपक्रम कृती क्रमांक सहा : | | |
|---|---|---|
| कृतीचे नाव | विद्यार्थी कृती | उपक्रमांची क्षणचित्रे |
| सेंद्रिय शेतीचा प्रचार व प्रसार | विध्यार्थी भेंडीचे वजन करून आकर्षक पद्धतीने वेष्टना मध्ये भरून गावातील सर्व शासकिय कार्यालये उदा.ग्रामपंचायत ,बँक,पोष्ट,प्राथमिक शाळा व उर्दू शाळा भेंडी देऊन प्रसार करतात. | Click&Watch<br>https://m.facebook.com/story.php?story_fbid=pfbid0EjxSMzEQ7kV96VhZUqEwnTW4DJQdpMMJkctyP7Gr5EHmDQ2TEvYpj7GJfG4Me3ufl&id=100001634710766&mibextid=ZbWKwL |
| *विद्यार्थाचा प्रतिसाद/विद्यार्थावर परिणाम* | | |
| उत्पादित होणाऱ्या भाज्या शालेय पोषण आहार मध्ये वापरून पुरेश्या झाल्यानंतर प्रचारासाठी मुले वापरत .मुलांना पोषण आहारा मधून सेंद्रिय भाजीची चव समजली.जी मुले भाज्या खाणे आवडत नसे ती मुले खाऊ लागली.सेंद्रिय शेतीचे महत्व त्यांना समजले.यातून मुलांना आपण समाजाचे कांही तरी देणे लागतो या गोष्टीचा संस्कार मनावरती झाला. | | |

| नवोपक्रमांतर्गत घेतलेले उपक्रम कृती क्रमांक सात : | | |
|---|---|---|
| कृतीचे नाव | विद्यार्थी कृती | उपक्रमांची क्षणचित्रे |
| गावातील प्रगतशील शेतकरी यांचा मार्गदर्शन वर्ग | विध्यार्थी मार्गदर्शन वर्गा मध्ये खरीप व रब्बी पिक यांच्या मध्ये कोणता फरक आहे हे समजून नोंद करून घेतात.माती विना शेती संकल्पना समजून घेण्याचा प्रयत्न करतात. | Click&Watch<br>https://m.facebook.com/story.php?story_fbid=pfbid02VPcNYkowEqccTEx6US8d17cb9PYYqzsKnQeNtos4SBYqbRscCchTSUjqS4Dou7eUl&id=100001634710766&mibextid=ZbWKwL |
| *विद्यार्थाचा प्रतिसाद/विद्यार्थावर परिणाम* | | |
| सखोल चर्चा रब्बी हंगाम मध्ये कोणती पिके येतील**रब्बी पिक*<br>हिवाळ्यात जे पिक घेतले जाते ते म्हणजे रब्बी पिक होय...<br>हे पिक ऑक्टोबर-नोव्हेंबर मध्ये पेरले जाते... (पेरणी हंगाम)<br>उन्हाळा लागण्याच्या वेळेस अर्थात मार्च-एप्रिलला हे पिक काढले जाते...(कापणी हंगाम) या व शेतीतील विविध प्रयोगावर (माती विना शेती) चर्चा झाली.मुलांना पेरणी हंगाम व कापणी हंगाम समजला.कोणत्या हंगामामध्ये कोणते पिक घेतले जाते हे या मार्गदर्शना मुळे समजले. | | |

| नवोपक्रमांतर्गत घेतलेले उपक्रम कृती क्रमांक आठ : | | |
|---|---|---|
| कृतीचे नाव | विद्यार्थी कृती | उपक्रमांची क्षणचित्रे |
| भेंडी काढणे व भेंडीचे आहारातील महत्व | विध्यार्थी भेंडी तोडण्याची क्रिया प्रत्यक्षकरतात.भेंडीचे निबर आणि कवळीअसे वर्गीकरण करतात. | Click&Watch<br>https://drive.google.com/file/d/1KNCOwuUTN-aNYTNxwcSJVMalDUfk2g1Q/view?usp=drivesdk |

*विद्यार्थ्यांचा प्रतिसाद/विद्यार्थ्यांवर परिणाम*

परसबागेतील भेंडी ची वाढ खुप छान पद्धतीने झाली होती .एक दिवसा आड भेंडी तोडणी करावी लागत होती.मुले खूप आनंदाने भेंडीचा तोडा करत आहेत .

मुलांना भेंडीचे आहातील महत्व समजले आहे....

दृष्टी सुधारते ...

पचन व्यवस्थित ठेवते ...

रोग प्रतिकारशक्ती मजबूत होते ...

त्वचा चमकदार होते ...

कोलेस्ट्रॉल नियंत्रित होते.इत्यादी

| नवोपक्रमांतर्गत घेतलेले उपक्रम कृती क्रमांक नऊ : | | |
|---|---|---|
| कृतीचे नाव | विद्यार्थी कृती | उपक्रमांची क्षणचित्रे |
| वांगी,मिरची ,पावठा तोडणे ,कोणत्या पद्धतीचे हवामान लागते व आहारातील महत्व समजून घेणे. | विध्यार्थी वांगी,मिरची ,पावठा तोडण्याची क्रिया प्रत्यक्षकरतात.चार ते पाच दिवसांच्या अंतराने मुले उत्साहाने वांगी तोडतात. | Click&Watch<br>https://drive.google.com/file/d/1KNCOwuUTN-aNYTNxwcSJVMalDUfk2g1Q/view?usp=drivesdk |

*विद्यार्थ्यांचा प्रतिसाद/विद्यार्थ्यांवर परिणाम*

परसबागेतील वांगी वाढ खुप छान पद्धतीने झाली होती .चार ते पाच दिवस अंतराने वांगी तोडणी करावी लागत होती.मुले खूप आनंदाने वांगीचा तोडा करत आहेत .

वांगीमध्ये कॅलरीजचे प्रमाण खूप कमी असते, जे वजन आणि कोलेस्ट्रॉल कमी करण्यास तसेच हृदय निरोगी ठेवण्यास मदत करते, अशा प्रकारे हृदयविकाराचा झटका, ट्रिपल व्हेसल डिसीज सारख्या जीवघेणा आजारांना आळा घालण्यास मदत करते.

Click&Watch : https://youtu.be/ijB4kUBu99s?si=beoULnrwhTFKHdoo

| नवोपक्रमांतर्गत घेतलेले उपक्रम कृती क्रमांक दहा : | | |
|---|---|---|
| कृतीचे नाव | विद्यार्थी कृती | उपक्रमांची क्षणचित्रे |
| प्रतिमेला पुष्पहार तयार करणे कार्यशाळा : टप्पा क्रमांक एक: फुले तोडणे | हार तयार करण्यासाठी फुले कश्या पद्धतीने तोडली जातात हे पाहून प्रत्यक्षफुले तोडतात | Click&Watch<br>https://drive.google.com/file/d/1KYELgQEuBGdYxD_ynoXImq4nog4gauyY/view?usp=drivesdk |
| टप्पा क्रमांक दोन : अशोक झाडाची पाने तोडणे. | मुले प्रत्यक्षात शालेय परिसरातील अशोक झाडाची फुले तोडतात . | https://drive.google.com/file/d/1KcDCrt709LAdpJhBrwdPfeuSgO_8h_J1/view?usp=drivesdk |
| टप्पा क्रमांक तीन: हार व दरवाजा तोरण तयार करण्याचे प्रात्यक्षिक : | हार तयार करण्यासाठी लागणारे सुई व दोरा कोणत्या प्रकारचा लागतो हे समजून घेतात.फुलांची लयबद्ध मांडणी कशी करावी हे समजून घेतात . | https://youtu.be/EylYIMGjabg?si=HgaMYU7oxGcco-gM |
| ❈विद्यार्थ्यांचा प्रतिसाद/विद्यार्थ्यांवर परिणाम❈<br>मा.श्री.प्रमोद चौगुले. कुरुंदवाड सर्वेसर्वा पद्मश्री फ्लावर मर्चंट❈ यांनी मुलांना हार तयार करण्यासाठी झेंडूच्या फुलाची व अशोकच्या झाडाची पानांची काढणी कशी करावी याची माहिती दिली त्या पद्धतीने मुलांनी काढणी केली. प्रतिमेचा हार कसा केला जातो पानांची व फुलाची रचना कशी करावी हे समजून घेऊन सर्व मुले हार तयार करू लागली.दीपावली सणाच्या वेळी लक्ष्मी पूजनासाठी घरी सर्व मुलांनी स्वत: हार तयार केले. | | |

**मुलांनी तयार केलेल्या हाराचे फोटो :** https://drive.google.com/file/d/1Kk3s-A1a-67e1hEat0dPQD4c26_9wGVm/view?usp=drivesdk

| नवोपक्रमांतर्गत घेतलेले उपक्रम कृती क्रमांक अकरा : | | |
|---|---|---|
| कृतीचे नाव | विद्यार्थी कृती | उपक्रमांची क्षणचित्रे |
| माती विना शेती : टप्पा क्रमांक एक: ग्लास गोळा करणे | मुलांनी आपल्या परिसरातील टाकाऊ गाल्स एकत्र जमा करतात. | **Click&Watch** https://drive.google.com/file/d/1L-7Ehb3ofo7MQZ_9oLPicNYBb0-5CaVS/view?usp=drivesdk |
| टप्पा क्रमांक दोन :प्लास्टीक पाच लिटरचे कॅन मिळवून होल पाडणे . | पाच लिटरची टाकाऊ कॅन एकत्र गोळा करून त्यांना गाल्सच्या मापाची होल पाडतात . | https://drive.google.com/file/d/1L-OTUPlXgA_yghBJO0b0v_kYN-x-9ky6/view?usp=drivesdk |
| टप्पा क्रमांक तीन: कोको पिट चा वापर करून बिया रुजविणे व त्यांचे निरिक्षन करणे. | शाळेच्या शेजारील असणारे मा.श्री.प्रभाकर आवटी(प्रगतशील शेतकरी )यांच्या कडून कोको पिट उपलब्ध करून कोथबिर च्या बिया रुजवितात. | |
| टप्पा क्रमाक चार : प्लास्टीक पाच लिटरचे कॅन मध्ये कोथंबिर उगवण झालेले ग्लास ठेवणे . | मुले पाणी कश्या पद्धतीने घालणे जाते त्या मध्ये कोणती पोषक द्रवे टाकली जातात याची माहिती करून घेतात. | https://drive.google.com/file/d/1KoJ4INauwzKV--XMWPG-KleMqvYsD5-y/view?usp=drivesdk |

*विद्यार्थ्याचा प्रतिसाद/विद्यार्थ्यावर परिणाम*

मातीचा वापर न करता शेतीचे उत्पन्न घेता येते. यालाच माती विना शेती असे म्हणतात. तसेच इंग्रजीत याला हायड्रोपोनिक्स असे म्हणतात.

Hydro म्हणजे पाणी

आणि ponics म्हणजे कार्यरत

पाण्यावर कार्यरत असलेले शेती हे मुलांना समजले.मुलेआपल्या घरी अश्या पद्धतीने प्रयोग करू लागली.

| नवोपक्रमांतर्गत घेतलेले उपक्रम कृती क्रमांक बारा : | | |
|---|---|---|
| कृतीचे नाव | विद्यार्थी कृती | उपक्रमांची क्षणचित्रे |
| सेंद्रिय शेती साठी जीवामृत तयार करणे व पंचपर्णी तयार करणे मार्गदर्शन वर्ग | जीवामृत तयार करणे व पंचपर्णी तयार कश्या पद्धतीने तयार केले जाते.त्याचा वापर कसा करावा मार्गदर्शन वर्गा मध्ये नोंदी करून घेतात . | Click&Watch |
| ⁎विद्यार्थ्यांचा प्रतिसाद/विद्यार्थ्यांवर परिणाम⁎ | | |
| जीवामृत तयार करणे व पंचपर्णी कश्या पद्धतीने तयार करता व त्याचे फायदे काय होऊ शकतात हे त्यांच्या लक्षात आले.झालेल्या मार्गदर्शन वर्गाची चर्चा घरी करूण सेंद्रिय शेती व जीवामृत महत्व आपल्या घरी व समाजात सांगतात. या मार्गदर्शन वर्गाचा परिणाम मुलांच्या मनावरती तर झालाच पण पालकांनी फोन करून खूप चांगला व महत्वाचा विषयाचे मार्गदर्शन मिळाले अश्या प्रतिक्रिया दिल्या. | | |

### ❑ v) उपक्रमोत्तर स्थितीचे निरीक्षण :

- ✓ सुरवातीला मुले परसबागेमध्ये कमी संख्येने किंवा बोलवावे लागत होते.जसजसी बाग फुलू लागलीतसे मुलांना बागेतून बाहेर काढवे लागत असे. या वरून असे लक्षात आले की मुलांची निसर्गाशी जवळीक वाढली आहे .
- ✓ मुलांना शेतीतील **प्राथमिक माहिती समजली** .
- ✓ मुलांच्या मना मध्ये सेंद्रिय शेतीचा संस्कार रुजण्यास सुरवात झाली.
- ✓ मुले आपापसात रासायनिक शेती व सेंद्रिय शेती या मधील फरक चर्चा करू लागली.
- ✓ **मुले परसबागेतील भाज्यांचीसर्व नावे इंग्रजी व मराठीत सांगू लागली.**
- ✓ मुले फळ व पालेभाज्या यांच्या पानाचा आकार ,रंग, वास यांच्यातील फरक समजू लागला
- ✓ रासायनिक खतांचे व रासायनिक औषधांचे दुष्परिणाम समाजाला .
- ✓ मुले भाज्याची नावे समजण्यासाठी इंग्रजीचा **शब्दकोश** वापरु लागली.
- ✓ विद्यार्थी **किलो, अर्धा,पावशेर ,पाऊन वजन करू लागली.** .
- ✓ संगणकाचा वापर करून Wrapper तयार करू लागली.
- ✓ मुलांना गुंठ्ठा हि संकल्पना समजली .
- ✓ तुषार सिंचन व ठिबक फायदे समजले .
- ✓ स्वत: सहभाग प्रत्येक कृति मध्ये असल्या मुळे मुले आनंदाने **शेती कामा मध्ये** सहभागी होऊ लागली.
- ✓ भाजीपाला माहिती समजण्यासाठी google lence चा वापर करतात .

- ✓ सिड बँक तयार करण्यासाठी मुलांच्या मध्ये बिया गोळा करण्याचा छंद वाढीस लागला .
- ✓ शेतीमधील नवनवीन प्रयोग समजले.
- ✓ माती विना शेती संकल्पना मुलांना समजली .
- ✓ मुले व्यावसायीक हार तयार करू लागली.
- ✓ मुलांना मिरचीचे ढीग लावणे व विक्री करण्याची पद्धत समजली.

## ❑ vi) कार्यवाहीचे टप्पे (वेळापत्रक )

या उपक्रमांतर्गत विद्यार्थांच्या मनामध्ये सेंद्रिय शेतीचा संस्कार व एकात्मिक शिक्षण देण्यासाठी आज अखेर केलेले प्रयत्न,कार्यक्रम व महत्वपूर्ण टप्पे खालीलप्रमाणे......

| अ.क्र. | कार्यवाही /उपक्रम अंतर्गत कृती | कालावधी |
|---|---|---|
| 1 | संस्थेचे चेअरमन , सदस्य ,मुख्याध्यापक व सहकारी शिक्षक यांच्याशी चर्चा. | जून 2023 |
| 2 | पालक सभा आयोजन व नवोपक्रमाची माहिती देणे. | पहिला आठवडा जुलै 2023 |
| 3 | तज्ज्ञांशी चर्चा. | जुलै 2023 दुसरा आठवडा |
| 4 | तज्ज्ञांच्या मदतीने लागणाऱ्या भौतिक साधनांची यादी बनविणे. | जुलै 2023 तिसरा आठवडा |
| 5 | खरीप पिकासाठी मशागत करून घेणे. | जुलै 2023 चौथा आठवडा |
| 6 | पेरणी व रोपाची लागण करणे | जुलै 2023 चौथा आठवडा |
| 7 | पाणी व्यवस्थापन | कालपरत्वे |
| 8 | बियाचे संकलण पालक विध्यार्थी व समाज यांचेकडून . | संपूर्ण ऑगस्ट महिना |
| 9 | भाजीपाला काढणी (जसे उत्पादन येईल तसे ) | वेळ दुपारी 2.00 |
| 10 | भाजीपाला वजन करणे व वितरीत करणे (जसे उत्पादन येईल) | वेळ दुपारी 4.30 नंतर |

❑ vii) उपक्रमासाठी इतरांची मदत.

राजापूर ता.शिरोळ जि.कोल्हापूर,येथे एकात्मिक शिक्षणाचा झरा,परसबाग खरा हानवोपक्रम राबिवताना नियोजनापासून अंमलबजावणी पर्यंत अनेक प्रगतशील शेतकरी **व दानशूर दाते,विध्यार्थी,पालक यांची मोलाची मदत झाली आहे.**

या नवोपक्रमासाठी मोलाचे सहकार्य साठी प्रगतशील शेतकरी मा.श्री.शुभम कारदगे य,राजापूर ता.शिरोळ.जि.कोल्हापूर.यांनी मोलाचे मार्गदर्शन व त्यांची प्रत्यक्षमदत अनमोल आहे.

**नवोपक्रमासाठी पुढे आलेले मदतीचे हात .(चळवळ लोक सहभागाची )**

| अ. क्र. | सन्माननीय देणगीदार | गाव | देणगीचा तपशील | रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री.गजानन रावसो पाटील . | राजापूर | नांगरट | 500 |
| 2 | कु. हर्ष महावीर पल्लके | अकिवाट | रोपे ,व बिया अंदाजे रक्कम | 200 |
| 3 | श्री. अजित मारुती बेरड. | अकिवाट | देशी मिरची रोपे दहा | 100 |
| 4 | कु.वेदांत सावंत | राजापूर | झारी पाच लिटर | 200 |
| 5 | श्री.विनायक घारगे . | राजापूर | ठिबक पाईप | 1000 |
| 6 | श्री.खोत रमेश | मजरेवाडी | बांबू काठ्या (60 नग) | 600 |
| 7 | श्री.संतोष पाटील | राजापूर | नांगरट व सरी पाडणे | 500 |
| 8 | श्री.प्रकाश चौगुले . | अकिवाट | 4 गुठ्ठे जमिन अंदाजे भाडे रक्कम (वर्षासाठी ) | 4000 |
| 10 | श्री.शुभम कारदगे | राजापूर | सेट नेट जाळी रब्बी साठी | 1000 |
| 11 | कु.रईस मोकाशी. | राजापूर | सुतळीएक किलो | 200 |
| 12 | श्री.ओंकार कुरणे | हांचीनाळ | रोपे | 1000 |

## viii) नवोपक्रमासाठी सादर करावयाचे पुरावे.




1) *शालेय आरोग्य मंत्री निवडून आल्यानंतर सुरू केला नवीन उपक्रम* sweet न वाटता परस बागे साठी लागणारे 200 रुपये किमतीची कोको पिट मधील रोपे टोमॅटो 20,वांगी 20, मिरची 20, झेंडू 10, व विविध प्रकारच्या बिया देऊन सहकार्य केले व एक समाज सेवेचा वेगळा पायंडा पाडला. धन्यवाद *हर्ष महावीर पल्लके* आरोग्य मंत्री.

2) ग्रेट भेट; दिनांक 22 Oct 2023. वेळ 7.30 p.m *"कुरणे ॲग्री":* हंचिनाळ . ता: निपाणी जिल्हा: बेळगाव.□□ काल सुट्टी निमित्त गावी गेलो असताना परस बागे करत असलेले विविध प्रयोग चर्चा सुरू झाली त्या वेळी माझे भाऊ मा.श्री.अनिल पाटील यांनी (कौलगे ता. कागल) येथील प्रगतशील शेतकरी मा.श्री.मधुकर पाटील यांनी त्यांना *वर्षभर वांगी,टोमॅटो, मिरची देणारी कलमी रोपे हंचिनाळ येथे मिळतात असे सांगितले.मी लगेचच माझा प्रवास हंचिनाळ दिशेने सुरू केला □□



आम्ही कामधेनू रोपवाटिके मधून रोपे घेऊन -कलमी वांगी रोपे शोधत* *मा.श्री.सुनील व अनिल कुरणे यांच्या रोप वाटीकेला भेट दिली* त्या वेळी त्यांची मुले *मा.श्री.प्रसाद अनिल कुरणे (9036428796) (सिव्हिल डिप्लोमा) व मा.श्री.ओंकार सुनील कुरणे(6366637099) (B.com)* या उच्च शिक्षित तरुणांनी आपल्या वडिलांच्या कडून मार्गदर्शन घेऊन कलमी फळ भाजी रोप वाटिका 20 गुंट्टे जागे मध्ये सुंदर रोप वाटिका सुरू केली आहे. कलम कसे केले जाते.त्याचे फायदे काय आहेत. त्याचावर होणार किडीचा प्रादुर्भाव, बंदोबस्त या विषयावर सखोल चर्चा झाली. *गुगल Meet च्या माध्यमातून आपल्या शाळेतील मुलांना कलम कसे केले जाते याचे मार्गदर्शन करण्याची ग्वाही दिली.* अजून एक गोष्ट आवर्जून उल्लेख करावा असे वाटते की ती म्हणजे आमच्या शाळेच्या परस बागे साठी 500 ते 600 रुपये किमतीची रोपे भेट दिली.आम्ही त्यांचा कष्टाला सलाम केला व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.~Thank you kurane Brothers Hanchinal~

## 2) परसबागेतील उत्पादित भाजीपाला .





**देशभक्त वार्ता :** *कांदा, मुळा, भाजी I अवघी विठाई माझी आई ||* असे पुस्तकी ज्ञान विद्यार्थ्यांना नेहमीच मिळते. पण प्रत्यक्ष सेंद्रिय शेतीचे ज्ञान शिक्षकांकडून विद्यार्थ्यांना मिळू लागले आहे. या सेंद्रिय भाज्यांचा वापर मध्यान्ह भोजनात होत आसल्याने दुपारचे जेवण स्वादिष्ट बनत आहे. राजापूर ( ता. शिरोळ) कुंभार हायस्कूल, मधील शिक्षकांनी प्रयोग प्रत्यक्षात उतरवला आहे.मुळातच शाळांना जागा कमी असते. शाळेच्या शेजारील असणारे शेतकरी मा. श्री.जयप्रकाश श्रीपाल चौगुले (Jp) (अकिवाट) यांनी परस बाग साठी 2 गुंठे जमीन कोणताही मोबदला न घेता परस बाग साठी वापरण्यास दिली आहे. त्या मुळे *देशभक्त हायस्कूल मध्ये फुलतोय ज्ञानमळा बरोबरच फळ, फुल, भाज्यांचा मळा.*

## * परसबागेतील उत्पादन मूळा*



*मुळा: ही भारतात उगवणारी एक आयुर्वेदिक औषधी वनस्पती आहे.हा एक प्रकारचा कंद आहे.याची भाजी, कोशिंबीर किंवा परोठे करतात.*

1) शास्त्रीय मताप्रमाणे मुळ्यात प्रथिने, कर्बोदके,फॉस्फरस आणि लोह असते.

2) जेवणात कच्चा मुळा खावा. कोवळ्या मुळ्याची कोशिंबीर खाल्ल्याने चांगली भूक लागून अन्न व्यवस्थित पचते.

3) मुळ्यात ज्वरनाशक गुण आहेत. त्यामुळे तापात मुळ्याची भाजी खाल्ल्यास खूप फरक पडतो.

*माहीत सौजन्य विकिपीडिया*

*** परसबागेतील उत्पादन भेंडी (Lady Finger)***परस बागे मधील मेथी,मूळा च्या यशस्वी उत्पादनानंतर सेंद्रिय भेंडी (Lady finnger) चा वापर शालेय मध्यान भोजना मध्ये

*चला तर मग जाणून घेऊया भेंडी खाण्याचे फायदे व्हिडिओ पाहून आताच खावू वाटेल भेंडीची भाजी.




अ..ब..ब..!!! भेंडी की दोडका ! प्रश्न पडला असेल ना तुम्हाला... काय झालं गेली चार दिवस पाऊस असल्यामुळे परस बागेतील भेंडी काढता आली नाही. त्या मुळे भेंड्या निबर झाल्या. *या सर्व भेंडीचा वापर फाउंडेशन बी तयार करण्यासाठी केला जाणार आहे* टीप: परस बागेतील भेंडी पूर्ण सेंद्रिय आहे.

## Live English

मुलांनी तयार केले आपल्याच product चे Wrapper ऑर packet* आता भेंडी ची विक्री होणार आकर्षक पॅकिंग मध्ये*.☘☘☘☘☘☘☘ इयत्ता नववी मधील इंग्रजी विषयातील Live English मधील Prepare an attractive wrapper or packet for any product of your choice* हा घटक मुलांना चांगल्या पद्धतीने समजला. *🖎🖎🖎🖎🖎वेगवेगळे आकर्षक wrapper आपल्या भेटीला*

परस बागेतील  उत्पादन □□ *वांग्याला हिंदीत बैंगन व इंग्रजीत Brinjal किंवा Eggplant म्हणतात.




संस्कृतमध्ये वृन्तांकम्, भण्टाकी असे दोन शब्द आहेत.* आज अर्धा किलो वांगी व मिरची(50 ग्रॅम) उत्पादन मिळाले. आजच्या मसाले भात मध्ये वापर करण्यात आला.*

***फायदे जाणून घेऊया***

वांगीमध्ये कॅलरीजचे प्रमाण खूप कमी असते, जे वजन आणि कोलेस्ट्रॉल कमी करण्यास तसेच हृदय निरोगी ठेवण्यास मदत करते, अशा प्रकारे हृदयविकाराचा झटका, ट्रिपल व्हेसल डिसीज सारख्या जीवघेणा आजारांना आळा घालण्यास मदत करते.

मधुमेहाच्या रूग्णांनी नियमित आहारात वांगीचा समावेश करणे आवश्यक आहे कारण ते फायबरचे समृद्ध स्त्रोत आहे, जे पचन योग्य करते. फायबरच्या उपस्थितीमुळे साखरेचे पचन चांगले होते आणि शोषण कमी होते. अशा वेळी रक्तातील साखर नियंत्रणात ठेवण्यात फारशी अडचण येत नाही.

- बागेतील फुलांची रांगोळी:*

वर्गात अशीच चर्चा चालु होती चला आज रांगोळी उपक्रम घेवू तेवढ्यात वर्गातील एक मुलगी बोलली



सर आपल्याला फुलांची रांगोळी काढता येईल का हो ? आणि मग काय एवढी फुले आणायची कुठून हा प्रश्न होता. परस बागेतील झेंडू फुलांची झाडाचा भर कमी झाला होता. त्याचा वापर करू असं निश्चित केलं रांगोळी साकारली.*विशेष म्हणजे रांगोळी झाल्यानंतर ती फुले इतरत्र न फेकता ख़त निर्मिति खड्डयात टाकली* यातून मुलांच्या मनात पर्यावरण विषयी जागृती निर्माण झाली.

**<u>एकात्मिक शिक्षणाचा झरा परसबाग खरा.” या नवोपक्रम अंतर्गत घेतल्या गेलेल्या कृती Facebook Page वरती नियमित upload केल्या जातात.</u>**

**<u>Facebook Page</u>**Link :https://www.facebook.com/ajit.patil.589100?mibextid=ZbWKwL

## 5) उपक्रमाची कार्यपद्धती :

१) जमिनींची/जागेची निवड: परसबागे साठी सर्वात महत्वाचा घटक म्हणजे जमिन. जून च्या शेवटच्या आठवडा मध्ये शाळेची जागा उपलब्ध नसल्यामुळे शाळे शेजारील शेतकरी मा.श्री.जयप्रकाश चौगुले यांची जमिन निश्चित केली.

2) जुलै पहिला आठवडा मशागत शाळेतील कर्मचारी वर्ग व विध्यार्थी

3) जुलै दुसरा आठवडा यांत्रिक Tractor चा वापर करून मशागत.

4) जुलै तिसरा आठवडा बियाची निवड , रोपांची निवड देशी वाणाचा जास्तवापर करण्यात आला आहे

५)मेथी लागवड ऑगस्ट पहिला आठवडा

६)पाणीपुरवठा नियोजन गरजेनुसार .

७) मेथी काढणी आहारात समावेश : 15 ते 25 ऑगस्ट

8) मुळा काढणी आहारात समावेश 30 ऑगस्ट

9) प्रगतशील शेतकरी संवाद : ऑगस्ट दुसरा आठवडा

10)भेंडी काढणी ऑगस्ट दुसरा आठवडा पासून सुरु.

११)हार निर्मिती कार्यशाळा सप्टेंबर

i) उपक्रम पूर्वस्तिथीची निरिक्षणे व नोंदी : मुलांना शेतीविषयक प्राथमिक ज्ञान कमी होते.भाजीपाला सर्व बिया ओळखू अडचणी येत होत्या.पाणीपुरवठा कोणत्या पद्धतीने केल्या नंतर शेतीचा पोत चांगला राहतो व उत्पादन वाढेते याची माहिती नाही.वजन व दर विक्री कोणत्या पद्धतीने केले जाते ,विपणन कसे करावे या विषयी ज्ञान कमी होते.फुलापासून हार तयार करणे .सेंद्रिय शेती सखोल कशी केली जाते या बद्दल ज्ञान कमी होते.

**ii) कार्यवाही दरम्यान केलेली निरिक्षणे व माहिती संकलन :**

शालेय वातावरणा मध्ये **नवचैतन्य** निर्माण झाले.

उपक्रमाच्या माध्यमातून मुलांच्या मध्ये संवाद कौशल्य वाढले.

विद्यार्थी आनंदाने **परसबाग काम करू लागली**

**प्रत्यक्ष कृती** प्रक्रिया मुळे आनंद वाटू लागला.

**Google लेन्स**आधारे माहिती शोधू लागला.

**iii) उपक्रम पूर्ण झाल्यावर केलीली निरिक्षणे व त्यांच्या नोंदी.**

वस्तुमान हि संकल्पना दृढ झाली.

पुष्प हार तयार करू लागली.

हायड्रोपोनिक शेतीची माहिती मिळाली.

फळ झाडांना कलम कोणत्या पद्धतीने केले जाते हे समजले.

जीवामृत तयार करणे.

**कार्यवाही करताना आलेल्या अडचणी.**

1) अनियमित व अनिश्चित पाऊस.
2) किडीचा प्रदुर्भाव
3) अवकाळी पाऊस.
4) शेती पंपासाठी असणारे भारनियमन

### ६.नवोपक्रमाची यशस्विता/ फलनिष्पत्ती:

ताजी हवा,हिरवळ आणि भरपूर सूर्यप्रकाश असलेले वातावरण सर्वांगीण स्वास्थासाठी प्रोत्साहन देते.परसबाग निर्मिती मुले नेहमी उत्साही अध्ययन –अध्यापन प्रक्रियेत आनंदी आहेत.मुले सर्वप्रकारच्या जीवाबाबत काळजी घेतात.वनस्पतीचे निरिक्षण करताना कुतूहल दाखवू लागली.विविध प्रश्न विचारू लागली.परसबागेतील वनस्पती ओळखू लागली.मुले परसबागे मध्ये फेरफटका मारताना झाडे आणि प्राणी यांचे निरिक्षण करू लागली.

राज्य अभ्यासक्रम आराखडा मधील मुद्द्दा क्रमांक सहा नुसार **व्यावसायिक शिक्षण** :पायाभूत स्तरावर एक ध्येय आहे.परसबागे कामे केल्या मुळे विधार्थी उत्पादक कार्यात अधिक सहभागी झाले.परसबागे मध्ये काम केल्या मुळे मुलांच्या मध्ये सामुहिक काम ,शारीरीक श्रम आणि कामाकडे पाहण्याचा सकारात्मक दृष्टीकोन तयार झाला.मला अशा वाटते कि मुलाचा मनावरती सेंद्रिय शेतीचा संस्कार कोरला गेला आहे.

माहितीचे विश्लेषण :आलेख

दशमान परिमाण(वस्तुमान) आधारित दहा गुणाच्या बहुपर्यायी चाचणी साठी इयत्ता आठवीचे खालील विध्यार्थी निवडण्यात आले.

| अ.न. | विध्यार्थी नाव | अ.न. | विध्यार्थी नाव |
|---|---|---|---|
| 1) | दानवाडे फरहान हमीदखान | 11 | गस्ते श्लोक सचिन |
| 2) | गुरव सर्वेश श्रीधर | 12 | पाटील प्रथमेश प्रवीण |
| 3) | जमादार निहाल जावेद | 13 | लोळसुरे शिवराज प्रवीण |
| 4) | कांबळे पुष्कर रविंद्र | 14 | पाटील अथर्व म्हादगोंडा |
| 5) | मुजावर निहाल अशफाक | 15 | पाटील चंद्रशेखर महादेव |
| 6) | पाटील हर्षवर्धन आमगोंडा | 16 | पुजारी महादेव अमोघसिद्ध |
| 7) | पाटील ऋषिकेश रवींद्र | 17 | दानवाडे मारुफ गैबीसाब |
| 8) | पाटील तन्मय म्हादगोंडा | 18 | पल्लके श्रवण महावीर |
| 9) | सनदी सनी रामचंद्र | 19 | छत्रे प्रतिक चिदानंद |
| 10) | उग्रे प्रेम सुनील | 20 | कदम वेदांत सचिन |

**शाळेचे नाव:** देशभक्त रत्नाप्पा कुंभार हायस्कूल राजापूर,ता.शिरोळ.जि.कोल्हापूर

वेळ : 20 मिनिट दिनांक : ---/---/--------- गुण : 20

विषय : गणित घटक : दशमान परिमाण(वस्तुमान)

प्रश्न 1. खालील योग्य पर्याया समोर टीक मार्क करा

1) राहुल ने बाजारातून अर्धा किलो टोमॅटो आणले म्हणजे किती ग्रॅम टोमॅटो आणले.

1) 50 ग्रॅम 2) 5000 ग्रॅम 3) 500 ग्रॅम 4) 5 ग्रॅम

2)महमद ने दुकानातून पावशेर साखर आणली म्हणजे किती साखर ग्रॅम आणली.

1) 500 ग्रॅम 2) 2500 ग्रॅम 3) 100 ग्रॅम 4) 250ग्रॅम

3) पीटरने पाऊन किलो भेंडी आणली म्हणजे किती भेंडी ग्रॅम आणली.

1) 750 ग्रॅम 2) 250 ग्रॅम 3) 725 ग्रॅम 4) 250ग्रॅम

4) स्वराने देशभक्त परस बागेतून एक किलो मुळा आणला म्हणजे किती ग्रॅम मुळा आणला.

1) 900 ग्रॅम 2) 1000 ग्रॅम 3) 100 ग्रॅम 4) 250ग्रॅम

5) प्रांजालीने बाजारातून सव्वा किलो कांदे आणले म्हणजे किती ग्रॅम कांदे आणले.

1) 1250 ग्रॅम 2)1050 ग्रॅम 3)250 ग्रॅम 4) 1500 ग्रॅम

6)सफियाने दीड किलो गाजर मार्केट मधून आणले म्हणजे किती ग्रॅम गाजरे आणली.

1) 1250 ग्रॅम 2)1050 ग्रॅम 3)250 ग्रॅम 4) 1500 ग्रॅम

7)एक तोळा सोने म्हणजे ....... मिली ग्रॅम होय.

1) 100 मिली ग्रॅम 2) 10 मिली मिली ग्रॅम

3) 1500 मिली ग्रॅम 4) 1000 मिली ग्रॅम

8)एक क्विंटल तांदूळ म्हणजे ..... किलोग्रॅम .

1) 100 किलोग्रॅम 2) 10 किलोग्रॅम

3) 1500 किलोग्रॅम 4) 1000 किलोग्रॅम

9) एक मेट्रिक टन ऊस म्हणजे ....... किलोग्रॅम

1) 100 किलोग्रॅम 2) 10 किलोग्रॅम

3) 1500 किलोग्रॅम 4) 1000 किलोग्रॅम

10) अर्धा मेट्रिक टन ऊस म्हणजे ....... किलोग्रॅम

1) 100 किलोग्रॅम 2) 10 किलोग्रॅम

3) 500 किलोग्रॅम 4) 1000 किलोग्रॅम


**नवोपक्रम पूर्व व उत्तर चाचणी गुण:**

| Sr.No | विद्यार्थी नाव | Pre -Test | Post -Test |
|---|---|---|---|
| 1 | दानवाडे फरहान हमीदखान | 12 | 18 |
| 2 | गुरव सर्वेश श्रीधर | 9 | 16 |
| 3 | जमादार निहाल जावेद | 5 | 16 |
| 4 | कांबळे पुष्कर रविंद्र | 12 | 20 |
| 5 | मुजावर निहाल अशफाक | 8 | 20 |
| 6 | पाटील हर्षवर्धन आमगोंडा | 12 | 18 |
| 7 | पाटील ऋषिकेश रवींद्र | 14 | 18 |
| 8 | पाटील तन्मय म्हादगोंडा | 10 | 16 |
| 9 | सनदी सनी रामचंद्र | 12 | 19 |
| 10 | उग्रे प्रेम सुनील | 8 | 19 |
| 11 | गस्ते श्लोक सचिन | 8 | 19 |
| 12 | पाटील प्रथमेश प्रवीण | 8 | 16 |
| 13 | लोळसुरे शिवराज प्रवीण | 14 | 18 |
| 14 | पाटील अथर्व म्हादगोंडा | 10 | 17 |
| 15 | पाटील चंद्रशेखर महादेव | 9 | 18 |
| 16 | पुजारी महादेव अमोघसिद्ध | 9 | 18 |
| 17 | दानवाडे मारुफ गैबीसाब | 6 | 16 |
| 18 | पल्लके श्रवण महावीर | 8 | 18 |
| 19 | छत्रे प्रतिक चिदानंद | 8 | 20 |
| 20 | कदम वेदांत सचिन | 4 | 14 |
| | **एकूण** | 187 | 352 |

**विद्यार्थांच्या पूर्वचाचणी व उत्तर चाचणी मध्ये झालेली गुणात्मक वाढ:**

## ✍ पूर्व व उत्तर चाचणीतील गुणांचा तुलनात्मक आलेख ✍

| पूर्व चाचणीतील सरासरी शेकडा गुण | उत्तर चाचणीतील सरासरी शेकडा गुण | पूर्व व उत्तर चाचणीतील सरासरी शेकडा गुणातील फरक |
|---|---|---|
| 47 % | 88 % | 42 % |




**निष्कर्ष** : वास्तुमान(दशमान परिमाण) मुलांच्या गोंधळ निर्माण होत होता. परसबाग वजन तागडी आणून नियमित सराव केल्या मुळे व प्रत्यक्ष वजन केल्या मुळे मुलांच्या संपादणूकीतील सरासरी शेकडा फरक दिसून येतो.हा फरक 41 % इतका आहे.यावरून असे लक्षात येते की मुलांचे कृतीतून शिक्षण दिले असता कायम स्वरूपी स्मरणात राहते.

## समारोप.....

पालक, आजी/माजी विद्यार्थी, ग्रामस्थ या सर्वांच्या मदतीनेसुंदर अशी सेंद्रिय परसबाग निर्माण झाली आहे..अजूनही वेगवेगळी उत्पादने घेत आहोत. डिसेंबर मध्ये झालेल्या आवकाळी पावसाने परसबाग पूर्ण उद्ध्वस्त झाली आहे. खचून न जातापुनः एकदा नवीन उत्साहाने एकात्मिक शिक्षणाचा झरा,परसबाग खरा उभा करू.या उपक्रमामुळे शेतीची **गुणवत्ता सुपीकता कशी वाढते यासाठी** निश्चितच  झाला आहे. तसेच **शाळेकडे पालकांचा दृष्टीकोन बदला आहे. मा.श्री.संतोष पाटील पुणे यांनी सर तुम्ही सजग व सुजाण नागरिक बनवत आहात हि प्रतिक्रीया बरंच काही सांगून जाते.पट संख्येमध्ये वाढ झाली आहे.** इतकेच नाही तर पुढील वर्षीचे **इयत्ता आठवीचे प्रवेश देखील आत्ताच पूर्ण झाले आहेत** म्हणजे आम्हाला इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांना प्रवेश घ्यावा म्हणून दारोदारी भटकायची सुद्धा गरज राहिली नाही. या **उपक्रमाचा फायदा फक्त आमच्याच शाळेला होणार नसून परिसरातील त्याचबरोबर कोल्हापूर जिल्ह्यातील इतर तालुके आणि महाराष्ट्र राज्यातील इतर जिल्ह्यांतील शाळा पालक शिक्षक विद्यार्थी यांना देखील होत आहे. या नवोपक्रमाचा सकारात्मक फायदा शाळेतील 8 वी ते 10 वी मधील सर्व 120 विद्यार्थ्यांना झाला आहे किंबहुना परसबागेला भेट अनेक शाळा सुद्धा देत आहेत. मी काहीतरी निर्माण करतो आणि त्याचा समाजातील विविध घटकांना लाभ होतो; त्यांच्याकडून तसे फीडबॅक मिळत आहेत तेव्हा हा अनुभव व याचा होणारा आनंद अवर्णनीय आहे.**

## नवोपक्रमबाबत निवडक प्रतिक्रिया व अभिप्राय:

1) **मा.श्री.मुकुंद माळी:**

*संत शिरोमणी सावता माळी यांनी कांदा मुळा भाजी अवघी विठाई माझी .या उक्तप्रमाणे प्रत्यक्ष विठोबा माऊली सावता माळी यांच्या रानात जाऊन त्यांना दर्शन दिले.अगदी त्या प्रमाणेच सर तुमच्या अथक परिश्रमाने तुम्ही जी परसबाग तयार केली आहे त्याप्रमाणे तुमची मुले ही त्या बागेमध्ये तहान भूक विसरून रमून गेली आहेत आणि याचे कारण म्हणजे तुम्ही प्रत्यक्ष  परमेश्वर रूपाने त्यांच्या मनात घर करून आहात आणि त्यामुळेच तुम्ही ज्या ज्या ठिकाणी हात लावाल त्या सर्वांचे सोनं च होणार थोडक्यात काय तुम्ही म्हणजे परीस आहेत.खरचं सर तुम्ही जी मेहनत घेतली आहे त्यातून एक गोष्ट लक्षात आली ती म्हणजे जर कोणत्याही कामाची सुरुवात जर आपल्या पासून केली तर या जगात अशक्य असे काही ही नाही.सर असेच तुमच्या कडून चांगले आदर्श काम नेहमी होत राहो हीच ईश्वर चरणी प्रार्थना*

2) **मा.श्री.नितीन परीठ:**

*ज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धेत सहभागी झालेले आमचे सन्माननीय मित्र अजित पाटील सर यांनी पुन्हा एकदा राज्य शासनाने घोषित केलेल्या परसबाग नवोपक्रम स्पर्धेत सहभाग घेऊन आपल्या विद्यालयाची वाटचाल सुरू ठेवली सर्वप्रथम त्यांनी शाळेच्या मैदानालगत परसबाग तयार करण्याचा निर्णय घेतला व मशागत करून भेंडी टोमॅटो वांगी गवारी वेगवेगळ्या प्रकारच्या पालेभाज्या यांची लागवड परसबागेमध्ये केली आणि यामध्ये त्यांना शाळेतील कर्मचारी वर्ग व सर्व विद्यार्थ्यांचे सहकार्य लाभले त्यांच्या सोशल मीडिया वरून मला नेहमीच परसबागेच्या प्रगती बाबत समजत होते परसबागेमध्ये त्यांनी सेंद्रिय शेतीचा प्रयोग केला पाण्याची बचत होण्यासाठी ठिबक सिंचन चा वापर देखील केला स सिंचन चा वापर करण्यासाठी त्यांनी गावातीलच शेतकऱ्यांकडून ठिबकची पाईप घेतली टाकाऊ पासून टिकाऊ वस्तू हे आपणास ठिबकच्या पाईप मधून पाहण्यास मिळेल त्यानंतर दीड ते दोन महिने गेल्यानंतर भेंडी टोमॅटो वांगी वेगवेगळ्या भाजीपाल्या भाजीपाला त्यांनी जवळच्या शाळेमध्ये प्राथमिक शाळेमध्ये तसेच ग्रामपंचायत मध्ये तलाठी कार्यालयामध्ये सर्व अधिकारी व कर्मचारी यांना परसबागेतील भाजीपाला दिला तसेच भूगोल मधील वितरण व्यवस्था विपणन व्यवस्था दाखवण्यात आली यातून मुलांना प्रात्यक्षिक अनुभव विपणन व्यवस्थेचा मिळाला त्याचबरोबर इंग्लिश विषयातील रॅपर ॲक्टिव्हिटी हे सुद्धा विद्यार्थ्यांना त्यांनी अनुभव दिला मुलांना पाव अर्धा किलो पाऊण किलो या प्रकारे वजन करून त्या शेतमालाची पॅकिंग करण्यासंदर्भात मार्गदर्शन केले त्याचबरोबर नुकताच दोन दिवसांपूर्वी झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतीचे कसे नुकसान झाले हे देखील मुलांना त्यांनी प्रात्यक्षिक अनुभव दिला शेती आपल्याकडील कशी बे भरवशाची आहे त्यासाठी आपण कोणत्या पद्धतीचे नियोजन करू शकतो याचे मार्गदर्शन त्यांनी विद्यार्थ्यांना केले अशा पद्धतीने परसबाग निर्मितीचे अजित पाटील सरांचे कार्य आपल्याला दिसून येते अजित पाटील सरांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा धन्यवा*

## संदर्भ सूची आणि परिशिष्टे :


1) दिशा नवोपक्रमाची - म.रा.शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,पुणे
2) परसबाग विकिपीडिया.
3) सकाळ :अग्रोवन
4) जीवन शिक्षण
5) श्री.सचिन देसाई.नवोपक्रम.
6) श्रीमती.नम्रता पाटील कमवा आणि नवोपक्रम